अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ७ ऑक्टोबर २०२२ ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : १० वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## संजू सॅमसनची झुंज व्यर्थ, भारताच ९ धावांनी पराभव



**लखनौ** : भारताचा कर्णधार बदलला खरा, पण त्यांचे नशिब मात्र बदलले नाही. कारण कर्णधार बदलल्यावरही भारतीय संघावर सलग दुसऱ्या सामन्यात पराभवाची नामुष्की ओढावली. दक्षिण आफ्रिकेने भारतापुढे विजयासाठी २५० धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताची २ बाद ८ अशी अवस्था झाली होती. पण त्यानंतर श्रेयस अय्यर आणि संजू सॅमसन यांनी अर्धशतकी खेळी साकारली. संजूने नाबाद ८६ धावा साकारत अखेरपर्यंत किल्ला लढवला. पण भारताला यावेळी ९ धावांनी पराभव पत्करावा लागला. दक्षिण आफ्रिकेच्या २५० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताची सुरुवात वाईट झाली. कारण भारताचा सलामीवीर शुभमन गिल हा फक्त तीन धावांवर बाद झाला आणि भारताला पहिला धक्का बसला. कर्णधार धवनला यावेळी फक्त ४ धावा करता आल्या, त्यामुळे भारताची २ बाद ८ अशी दयनीय अवस्था झाली होती. पण त्यानंतर काही काळ ऋतुराज गायकवाड आणि इशान किशन यांची चांगली भागीदारी झाली. पण सहा चेंडूच्या फरकाने हे दोघेही बाद झाले. त्यानंतर श्रेयसने ५० धावांची खेळी साकारली. शेवटी सॅमसन आणि शार्दुल ठाकूर हे काही काळ खेळपट्टीवर होते. पण चेंडू बॅटवर येत नसल्यामुळे भारताचा पराभव झाला.

# गर्दी जमली, पण भाषण नाही जमले; शिंदे वनवे उठले, ठाकरे चौफेर सुटले

सुराज्य/सोलापूर

**'अरे आव्वाज कुणाचा...? शिवसेनेचा..., कोण आला रे कोण आला...? शिवसेनेचा वाघ आला...' अशा गगनभेदी घोषणांनी शिवतीर्थ दणाणून सोडणाऱ्या शिवसेनेत फूट पडल्यानंतर पहिल्यांदाच दसरा मेळावा झाला. शिवसेनेतील दोन्ही गटाने दोन स्वतंत्र मेळावे घेतले. कोणाच्या मेळाव्याला किती गर्दी होणार? त्यावरून खरी शिवसेना कोणाची हे ठरणार; असा अंदाज बांधला जात होता. शिंदे गटाच्या बीकेसी मैदानावर गर्दी जमली, पण भाषण मात्र शिवतीर्थावरच ठाकरेंनाच जमले. त्यांनी बंडखोर शिंदे गटापासून ते भाजप, मोदी-शहा आणि आरएसएसवर चौफेर फटकेबाजी केली. शिंदेंनी मात्र उध्दव एके उध्दव हाच पाढा चालवल्यामुळे त्यांचे भाषण वनवे ठरल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्रभर उमटली.**



'आमचीच शिवसेना खरी' असा दावा ठाकरे आणि शिंदे गटाकडून केला जात आहे. शिवसेना, शिवतीर्थ आणि दसरा मेळावा हे अनेक वर्षांचे समीकरण बनले आहे. म्हणून दोन्ही गटांनी दसरा मेळाव्यासाठी शिवतीर्थावर अग्रहक्क सांगितला. वाद न्यायालयात पोहचला. तेव्हा न्यायालयाने ठाकरे गटाला झुकते माप दिल्यामुळे शिवतीर्थ ठाकरे गटाला मिळाले. साहजिकच शिंदे गटाने त्यांचा मेळावा बीकेसीच्या मैदानावर घेतला. दोन्हीकडे गर्दी जमली. दोन्ही मैदाने हाऊसफुल्ल झाली. तुलनेत बीकेसी मैदान मोठे असल्यामुळे तिथे झालेली गर्दीही मोठी होती. म्हणजेच अधिक गर्दी जमवणे शिंदे यांना जमले. पण जे भाषण ठाकरेंना जमले ते शिंदेंना जमले नाही. गर्दीत शिंदेंनी मैदान मारले असले तरी भाषणात मात्र ठाकरेंनीच मैदान मारले, अशी चर्चा दुसऱ्या दिवशी महाराष्ट्रभर रंगली.

शिवतीर्थापेक्षा बीकेसी मैदान मोठे असल्यामुळे ते खचाखच भरण्यासाठी शिंदे गटाने गर्दी जमवली. राज्यातील कानाकोपऱ्यातून लोक सभेसाठी बीकेसी मैदानावर नेले.

त्यासाठी अनेक बसगाड्या भाड्याने घेतल्या. दुसरीकडे ठाकरेंच्या शिवसेनेसाठी मुंबई हे होमग्राऊंड आहे. साहजिकच होमग्राऊंडवरचे मुंबईकर शिवतीर्थावर स्वत:हून पोहचले. त्यामुळे शिवतीर्थावर गर्दी जमली; जमवावी लागली नाही.

### शिवतीर्थ खिळून बसले, बीकेसी उठून गेले

शिवतीर्थावर मुख्य भाषण झाले ते उध्दव ठाकरे यांचे. त्यांच्यापूर्वी अन्य वक्त्यांनीही आपल्या भाषणाने मैदानावरील उपस्थितांना जागेवर खिळवून ठेवले. मेळावा संपेपर्यंत शिवतीर्थावरून मध्येच कोणीही उठताना दिसले नाही. दुसऱ्या बाजूला खुद्द एकनाथ शिंदे यांचे भाषण चालू असतानाही अनेक लोक उठून मैदान सोडून जात होते. मैदान खुर्च्यांनी भरले होते; पण खुर्च्या रिकाम्या दिसत होत्या. हे चित्र शिवतीर्थाच्या एकदम उलटे दिसत होते.

### आव्वाज शिवतीर्थाचाच

शिंदे गट आणि उद्धव ठाकरे गटातील मेळाव्यांमधील एकूण आवाज किती होता याबद्दलची माहिती आवाज फाउंडेशन या संस्थेच्या अहवालामधून समोर आली आहे. उद्धव ठाकरेंचा मेळावा झालेल्या शिवाजी पार्कमधील सरासरी आवाज हा १०१.६ डेसिबल इतका होता. त्याचवेळी बीकेसीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या शिंदे गटाच्या दसरा मेळाव्याचा सरासरी आवाज हा ८८ डेसिबल इतका होता.

### धनुष्यबाणाचा आज फैसला

शिवसेना खरी कोणाची? शिवसेनेचे निवडणूक चिन्ह धनुष्यबाण कोणाचा? उध्दव ठाकरे गटाचा की एकनाथ शिंदे गटाचा? याचा फैसला निवडणूक आयोगासमोर गुरूवारी होण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्याकडून केल्या जाणाऱ्या परस्परविरोधी दाव्यांबाबत निवडणूक आयोगाकडून काय निर्णय देण्यात येतो, याबाबत राज्यासह देशभरात उत्सुकता निर्माण झाला आहे. याबाबत पारदर्शक पद्धतीचा अवलंब केला जाईल, असे राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी म्हटले आहे.

## घट विसर्जनासाठी गेल्यानंतर तरूणाचा विहिरीत बुडून मृत्यू

**सोलापूर** : कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) येथे पाय घसरून विहिरीत पडल्याने श्रीनिवास अंबाजी खुणे (वय १७ रा.विजयनगर, कुंभारी) हा तरुण पाण्यात बुडून मरण पावला.

गुरुवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास तो घराजवळील विहिरीत गेला होता. त्यावेळी ही दुर्घटना घडली. त्याच्या घरातील घट विसर्जन करण्यासाठी तो आईसमवेत विहिरीवर गेला होता. पाण्यात बुडत असताना आईने त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला पण यश आले नाही. विहिरीत दलदल होते. त्यात अडकून त्याचा मृत्यू झाला. त्याला अग्निशामकच्या पथकाने पाण्याच्या बाहेर काढून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मरण पावला. या घटनेची नोंद वळसंग पोलिसात झाली.

## दिवाळीनंतर सार्वजनिक नळ बंद करणार : आयुक्त

**सोलापूर** : पालकमंत्री विखे पाटील यांनी सार्वजनिक नळ कनेक्शन तोडण्याचे आदेश दिले असले तरी महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिवाळीपर्यंत वैयक्तिक नळ घेण्यासाठी जनजागृती करण्याचे ठरवले आहे.



दिवाळीनंतर सार्वजनिक नळ बंद करण्यात येईल, असे आयुक्ताने सांगितले. पाण्याचा अपव्य टाळण्यासाठी आणि मीटर सिस्टीम बसवण्यासाठी मध्यंतरी महापालिका आयुक्त शिवशंकर यांनी सार्वजनिक नळ बंद करण्याचे आदेश दिले होते. मात्र नुकत्याच झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आयुक्तांच्या या निर्णयाला आमदार सुभाष देशमुख, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार प्रणिती शिंदे यांनी विरोध केला. त्यामुळे दिवाळीच्या तोंडावर पालकमंत्री विखे पाटील यांनी सार्वजनिक नळ बंद करू नये असे आदेश देत स्थानिक आमदारांशी चर्चा करून पुढील निर्णय घ्यावा असे विखे पाटील यांनी सांगितले. याबाबत आयुक्तांना विचारले असता ते म्हणाले की, दिवाळीपर्यंत खाजगी नळ घेण्यासाठी महापालिकेच्या वतीने जनजागृती करण्यात येईल.

सर्वांनी जर खाजगी नळ घेतली. तर पाण्याचा अपव्य ठरणार आहे. त्यामुळे भविष्यात हे सोलापूर साठी उपयुक्त ठरणार आहे. भाडेकरू असलेल्या नागरिकांनी डिपॉझिट सह अपडेट सादर करून व्यक्तिगत नळ कनेक्शन घ्यावे असे आवाहन पालिका आयुक्त शिवशंकर यांनी केले आहे. तसेच झोपडपट्टी भागात डिपॉझिट घेताना त्यांना त्यांची सुविधा देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## तरुणीची गळफासाने आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

मार्डी (ता.उत्तर सोलापूर) येथील सेवालालनगर तांड्यात राहणाऱ्या एका १७ वर्षीय तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. काजल पिंटू वडजे (वय १७ रा.सेवालाल नगर तांडा,मार्डी) असे मयत झालेल्या तरुणीचे नाव आहे.

काल बुधवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास तिने घरातील छताच्या पंख्याला ओढणीने गळफास घेतली होती. तिला फासातून सोडवून नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र ती उपचारापूर्वीच मयत झाली. मयत काजल वडजे ही अकरावी इयत्तेत शिकत होती. तिच्या पश्चात आई-वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. फौजदार निंबाळकर पुढील तपास करीत आहेत.

## बेशुद्ध करून महिलेला लुटले; चौघांवर गुन्हा

**मोहोळ** : अज्ञात चार चोरट्यांनी एका ३६ वर्षीय महिलेला मारहाण करीत तिच्या तोंडावर कसली तरी पावडर टाकून तिला बेशुध्द करून तिच्या अंगावरील ६८ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना दि.५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता वाळूज ते वैराग रोडवर वाळूज हद्दीत घडली.

सज्जना बाबासाहेब खरात (रा. वाळूज) या शेती व मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. दि.५ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजताच्या दरम्यान वाळूज ते वैराग जाणाऱ्या रस्त्यावरून त्या नेहमीप्रमाणे शेतामध्ये पायी चालल्या होत्या. दरम्यान कादे यांच्या शेताजवळ त्या आल्या असता कादे यांच्या द्राक्षाच्या बागेतून अचानक तोंडाला काळे कपडे बांधलेले समोरून दोन व पाठीमागून दोन अज्ञात इसम आले.

त्यांनी सज्जना यांच्या डोक्यावरून टोपली खाली टाकून त्यांना मारहाण केली. त्यांच्यातील एकाने खिशातून पावडर तोंडावर टाकली. त्यामुळे त्या चक्कर येऊन बेशुद्ध झाल्या. याची संधी साधत अज्ञात चोरट्याने त्यांच्या अंगावरील गंठण, कानातील फुले, झुबे, चांदीची जोडवी असा एकूण ६८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. दरम्यान त्या बेशुद्ध पडण्याची माहिती नातेवाईकांनी कुटुंबीयांना दिली. अशा आशयाची फिर्याद दि.६ ऑक्टोबर रोजी स्वत: सज्जना खरात यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात दाखल केली असून यानुसार मोहोळ पोलिसांनी अज्ञात ४ चोरट्यांच्या विरोधामध्ये गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक धनाजी खापरे हे करीत आहेत.

## गुंठेवारी क्षेत्रातील व्यक्तिगत प्लॉटचीही मोजणी करता येणार

### पैसे भरून नागरिकांना मोजणी करण्यास मुभा

सुराज्य/मोहोळ

सोलापूर महापालिका हद्दीतील गुंठेवारी क्षेत्रातील तीन ठिकाणची मोजणी भूमी अभिलेख विभागांतर्गत पूर्ण झाली आहे. दरम्यान गुंठेवारीच्या क्षेत्रातील व्यक्तिगत प्लॉटचीही आता भूमी अभिलेख विभागांस पैसे भरून नागरिकांना मोजणी करून घेता येणार आहे. गुंठेवारी भागातील घरे नियमित करण्याचा प्रश्न सोलापूर शहरात गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर या प्रश्नाला उकळी फुटते. निवडणूक झाल्यावर गुंठेवारीचा प्रश्न देखील तेवढ्या पुरता शांत होतो.



त्यामुळे दीड लाख मालमत्तेची अडवणूक होत असून हा गुंठेवारी प्रश्न मार्गी लावणार कोण, असा प्रश्न हद्दवाढ भागातील नागरिक विचारत आहेत. शहरात किमान एक ते दीड लाख मिळकती गुंठेवारी स्वरूपात मोडतात. जास्त मिळकती या हद्दवाढ भागात आहेत. या संदर्भात काही संस्था, संघटना व लोकप्रतिनिधींनीही आग्रही मागणी केली होती. सह्यांची मोहीम राबविण्याबरोबरच निवेदन दिली होती. तातडीने गुंठेवारीचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी जोर धरत आहे. गुंठेवारी क्षेत्रातील लोकांना परवाना द्यावा, अशी मागणी आमदार व लोकप्रतिनिधींकडूनही यापूर्वी करण्यात आली आहे.



### तीन ठिकाणची मोजणी पूर्ण : आयुक्त

गुंठेवारी क्षेत्रातील तीन ठिकाणची मोजणी महापालिकेच्या माध्यमातून भूमी अभिलेख कार्यालयाकडून पूर्ण झाली आहे. गुंठेवारी क्षेत्रातील व्यक्तिगत प्लॉटचीही मोजणी भूमी अभिलेख कार्यालयास फी भरून नागरिकांना करून घेता येणार आहे. यामुळे आता या कामात गती येणार आहे, असे पालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी सांगितले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पाऊस आता येणार नाही, सई वाटतं होत!!!

| कल्याण |
|---|
| --------- |

| मेन बाजार |
|---|
| --------- |

## डॉक्टरांनीच डॉक्टराचे वाचवले प्राण | 'देव तारी, त्याला कोण मारी'

सुराज्य/सोलापूर

**देव तारी त्याला कोण मारी,असे एक मराठीत सुभाषित आहे. त्याचा प्रत्यय कधी कधी येत असतो. माणसाचे आजचे जीवन क्षणभंगुर झाले आहे. कोणत्या वेळेला काय होईल हे सांगता येत नाही. अशा कठीण समयी मात्र देव धावून येतो, अशी माणसाची धारणा असते.असाच एक प्रसंग बार्शीतील एका डॉक्टरांवर ओढवला होता. प्रसंग तसा जिवावर बेतणाराच होता. परंतु वेळीच नियतीला दया आल्याने त्या डॉक्टरांना नवजीवन मिळाले.**

झाले असे की, बार्शीत एका हॉस्पिटलमध्ये हृदयरोग विभागाचे उद्घाटन करण्याचा कार्यक्रम सुरू असताना त्या हॉस्पिटलच्या अधीक्षक डॉ. राम जगताप यांना अस्वथ वाटू लागले. ते कार्यक्रमाची प्रस्तावना करत असतानाच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. परंतु व्यासपीठावर उपस्थित असलेल्या डॉक्टरांच्या हे लक्षात आले आणि त्यांनी तातडीने त्यांना रुग्णालयात नेऊन उपचार केले. 'क्रिटीकलर' परिस्थितीतून त्यांना सुखरूप बाहेर आणले. व्यासपीठावरील डॉक्टरांनी दाखविलेल्या समयसूचकतेमुळे 'त्या' डॉक्टरांवर आलेले संकट टळले. बार्शीतील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये चाळीस कोटी रुपये खर्च करून नवीन ट्रामा सेंटरमध्ये कॅथलॅब आणि हृदयरोग विभाग सुरू करण्यात आला आहे. या विभागाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी आमदार राजेंद्र राऊत, डॉ. विवेक जावळी, डॉ. बी. वाय. यादव, डॉ. आदित्य साखरे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रम सुरू होत असताना कार्यक्रमाचे संयोजक डॉ. जगताप हे प्रस्तावना करण्यासाठी उभे राहिले. ते दोन-चार शब्द बोलले आणि त्यानंतर त्यांना बोलताच येईना. त्यांना प्रचंड अस्वस्थ वाटू लागले. त्यांनी तेथेच उभे राहून पाणीही प्याले. परंतु तरीही त्यांना अस्वस्थच वाटू लागले. त्यानंतर त्यांनी प्रस्तावना करण्याचे थांबविले आणि ते खाली बसले. खुर्चीवर जाऊन बसल्यानंतर त्यांना व्यासपीठावरच उलटीही झाली.

व्यासपीठावर उपस्थित असलेल्या सर्वाच्याच लक्षात आले की- काही तरी गंभीर घडू लागले आहे. तेथेच असलेले डॉ. आदित्य साखरे यांनी ताबडतोब त्यांना स्ट्रेचरवरून हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात नेले आणि त्यांच्या विविध तपासणी केल्यानंतर त्यांच्या शरीरातील रक्तवाहिनी पूर्णपणे ब्लॉक झाली असल्याचे तपासणीतून निष्पन्न झाले. या नंतर डॉ. साखरे यांनी त्यांच्यावर शस्त्रक्रिया करून त्यांच्या रक्तवाहिनीतील ब्लॉकेजेस काढून 'स्टेन' टाकली आणि त्यांच्यावर उपचार सुरू ठेवले.




### अन् अनर्थ टळला...

कार्यक्रम संपल्यानंतर सर्वजणांनी अतिदक्षता विभागाकडे धाव घेतली. त्यावेळी नेमका प्रकार काय घडला याची माहिती डॉ. साखरे यांनी दिली. या कार्यक्रमाचे आयोजन हॉस्पिटलच्या आवारातच करण्यात आले असल्याने आणि उपस्थितांच्या लक्षात वेळीच घटनेचे गांभीर्य लक्षात आल्याने डॉ. जगताप यांच्यावरील वाईट वेळ टळली.